महाराष्ट्र वन विभाग
"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

महाराष्ट्र शासन
वनविभाग

**उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर**
**मु.पो.तालुका जुन्नर, दादोजी कोंडदेववाडा, जि. पुणे - 410502.**

दूरध्वनी क्र. 02132 222063
Email ID: junnarforestdn@gmail.com / dycfjunnar@mahaforest.gov.in

**क्रमांक-ब/कक्ष-4.2/जमीन/ 155 /2021-22,** **दिनांक 26 /08/2021**

**प्रती,**

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे-1**
**बी बरॅक, मध्यवर्ती इमारत परिसर, कॅम्प, पुणे.**

**विषय :** वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत कलम 2 प्रमाणे सन 1980 पुर्वी अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी वनक्षेत्र 0.531 हे मिळणे बाबत. ( **पुणे-शिरूर- अहमदनगर रस्ता राज्य महामार्ग क्र. 05 कि. मी. 10/600 ते कि. मी. 36/600 पी. एन. 163 जि. पुणे)Proposal No. FP/MH/ROAD/142578/2021.**

**संदर्भ :** आपलेकडील पत्र क्र. सा.बां.वि.पू./प्रशा-3/हा.अॅ./पी.एन-163/7765, दि. 02.08.2021.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत कलम 2 प्रमाणे सन 1980 पुर्वी अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी वनक्षेत्र 0.531 हे मिळणेबाबत. ( **पुणे-शिरूर- अहमदनगर रस्ता राज्य महामार्ग क्र. 05 कि. मी. 10/600 ते कि. मी. 36/600 पी. एन. 163 जि. पुणे)Proposal No. FP/MH/ROAD/142578/2021.** आपण प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता. सदर प्रस्तावामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1. प्रस्तावात रस्त्याची रंदी 30 मीटर दर्शविली आहे. त्यातुन अस्तित्वात असलेला रस्ता 18.20 वगळता उर्वरित 11.80 मीटर रूंदीकरणासाठी परवानगी मिळविण्यासाठी आपण प्रस्ताव सादर केलेला आहे. तथापी संपूर्ण 30 मीटर रूंदीचे क्षेत्र वळतेकरणासाठी प्रस्तावित करावे.
2. रेफरन्स् इंडेक्स नं. 1 ते 21 व 23 ते 35 अनावश्यक असल्याने प्रस्तावातुन काढून टाकावेत.
3. पूर्ण 30 मीटर रूंदीचा रस्ता प्रस्तावित केल्यानंतर 450 मीटर X 30 मीटर =13500 स्वेअर मीटर म्हणजेच 1.35 हे. होणार आहे. रस्त्यासाठी वळतेकरण करावयाच्या वनक्षेत्राचे पर्यायी वनीकरणासाठी तेवढेच वनेत्तर क्षेत्र उपलब्ध करून दयावे लागणार आहे. तरी त्या अनुषंगाने प्रस्तावात सुधारणा करण्यात यावी.
4. प्रस्तावित रस्त्यासाठी इतर तीन पर्यायी आखणी दर्शवून इतर दोन आखणी (Alternative alignment) रद्द करण्याभागची कारणे नमुद करून नकाशे प्रस्तावात जोडावे.

5. प्रस्तावात ग्रामसभेचे ना हरकत प्रमाणपत्र व ठराव सादर करावा.

6. प्रस्तावात सादर केलेली मराठी भाषेतील सर्व दस्तांचे आंग्ल भाषेत भाषांतर करून सादर करावे.

7. Geo - Digital नकाशा प्रस्तावात जोडावा.

8. टोपोशिट मध्ये रस्त्यासाठी बाधित होणारे वनक्षेत्र दर्शवावे.(संपूर्ण वनगट क्रमांक)

उपरोक्त प्रमाणे उपस्थित त्रुटींची पूर्तता करून पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. जेणेकरून योग्य त्या शिफारशीसह प्रस्ताव मान्यतेसाठी वरिष्ठ कार्यालयास सादर करणे सोईचे होईल.

(जयरामेगौडा.आर)
उप वनसंरक्षक,
जुन्नर वनविभाग, जुन्नर

प्रस्तावाच्या ६ प्रती
दि. ६/०९/२०२१ रोजी
मिळाल्या.
०६/०९/२०२१